७९२ एस.सी.आर. सर्वोच्च न्यायाल्याचे अहवाल (१९५०)

ए.एम. मायर आणि कंपनी

विरुद्ध

गोरधनदास सागरमूल

<u>१९५०</u>

३० नोव्हेंबर

(सय्यद फझल अली, पतंजली शास्त्री आणि मेहर चंद महाजन जे.जे.)

लवाद – " विकल्या गेलेल्या " आणि " खरेदी केलेल्या " नोटान्द्वारे विक्रीसाठी दलालाद्वारे करार – लवाद कलम – विक्रेत्याने लवाद कलम लागू करण्यासाठी दलालाचा अधिकार नाकारणे – लवादाचे अधिकारक्षेत्र – निवाड्याची वैधता – कराराची निर्मिती.

दलालांची एक कंपनी असलेल्या अपिलकर्त्यांनी प्रतीवादिना उद्देशून लिहलेल्या विक्रीसुचनपत्र अंतर्गत तागाच्या विक्री आणि खरेदीसाठी करार केला ज्यावर त्यांनी 'ए आणि कंपनी, दलाल' म्हणून स्वाक्षरी केली आणि त्याच तारखेची आणि त्याच तागाच्या नगांच्यासाठी विक्रीनोट तिसऱ्या व्यक्तीला संबोधित केली ज्यावर त्यांनी 'ए आणि कंपनी, दलाल ' म्हणून स्वाक्षरी केली. विक्रीसुचना पत्रामध्ये नेहमीची लवादाची अट होती, ज्या अंतर्गत ' करारामुळे आणि / किंवा त्याच्या संबंधात आणि / किंवा

त्याच्या परिणामी किंवा त्याच्याशी संबंधित उद्भवणारे सर्व विषय, प्रश्न, विवाद, मतभेद आणि / किंवा दावे बंगाल चेम्बर ऑफ कॉमर्सच्या लवादाकडे पाठवले जातील अशी अट होती. विक्रीसुचनापत्र पुरावा दिलेल्या करारातून मान्यताने उद्भवलेल्या प्रकरणाबाबत वाद निर्माण झाल्यानंतर अपीलकर्त्यांनी हा वाद लवादाकडे पाठवला. प्रतीवादींनी लवादासमोर पुढील युक्तिवाद मांडला की, अपीलकर्ते केवळ दलाल असल्याने त्यांना हे प्रकरण लवादाकडे पाठवण्याचा अधिकार नाही. लवादाने अपीलकर्त्यांच्या बाजूने निकाल दिला. प्रतीवादींनी हा निर्णय रद्द करण्यासाठी भारतीय लवाद कायद्याअंतर्गत उच्च न्यायलयात अर्ज केला.

सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, हे जरी गृहीत धरले की, उत्तरवादींना ह्या टप्प्यावर हा आक्षेप उपस्थित करता येऊ शकत होता की, ज्याअर्थी मूळ वाद हा पक्षकरांमधील कराराचा खरा अर्थ लावण्याचा भाग होता आणि उत्तरवादींना त्यांचा दावा शाबित करण्याकरिता कराराचा आधार घ्यावा लागणार होता, त्यार्थी प्रतिवादींनी निर्माण केलेला वाद देखील लवादाच्या करारमध्ये सामील होता आणि त्यामुळे लवादाचा निवाडा भारतीय लवाद कायदा, १९४० खाली अवैध आणि कार्यकक्षे बाहेरील या कारणाखाली रद्दबातल ठरविता येत नाही.

हेमन विरुद्ध डार्विनस लिमिटेड (१९४२) ए.सी. ३५६) चा संदर्भ घेतला.

अपील न्यायनिर्णय: दिवाणी अपील क्र. १९५० चा XLII.

कलकत्ता उच्च न्यायाल्याचा न्यायनिर्णय (हॅरिस मुख्य न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती चक्रवर्ती) यांचे अपील क्र. ७८/१९४८ मधील निकालाविरुद्ध अपील.

एन.सी. चॅटर्जी (सोबत बी.सेन) अपीलकार्त्यासाठी

ए.एन. ग्रोवर प्रतीवादिंसाठी

१९५०. ३० नोव्हेंबर. फझल अली जे. यांनी न्यायनिर्णय दिला.

हे अपील पश्चिम बंगाल मधील कलकत्ता येथील उच्च न्यायालायाच्या न्यायनिर्णया विरुद्ध आहे, की ज्याद्वारे त्याच न्यायालयाच्या एकल न्यायमुर्तींचा न्यायनिर्णय उलटवीण्यात आला, ज्यात प्रतिवादीने सदर केलेल्या निवेदनावरून बंगाल चेम्बर ऑफ कॉमर्सच्या लवाद न्यायकरणाने दिलेला निवाडा रद्द करण्यास नकार दिलेला होता. या प्रकरणाची तत्थे पुढीलप्रमाणे आहेत.

२५ जानेवारी १९४६ रोजी, अपीलकर्त्यांनी उत्तरवादींची पाच हजार मण तागाच्या विक्रीसाठी करार केला, ज्याचा पुरावा विक्रीसुचनापत्र (प्रदर्शन अ) द्वारे दिला गेला जो प्रतीवादींना उद्देशून लिहलेल्या पत्राच्या स्वरुपात आहे ज्याची सुरुवात या शब्दांनी होते ‘आम्ही ह्या दिवशी तुमच्या मागणीनुसार आणि तुमच्या खात्यासाठी खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीस विकला आहे. अधोरेखित केलेला शब्द खाली स्वाक्षरी केलेल्या, हा शब्द अपिलकाराचा संदर्भ देतो आणि कराराच्या शेवटी त्यांच्या स्वाक्षरी खाली दलाल हा शब्द लिहलेला आहे. त्याच दिवशी अपिल्कार्त्यानी बंगाल जुट कंपनी ला खालील विधानासह क्रीतपत्र (प्रद्रष्ण बी) संबोधित केली होती. ‘ आम्ही

आज तुम्च्या आदेशानुसार व तुमच्या खात्यासाठी खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीकडून खरेदी केलेली आहे’. ह्या नोटेमध्ये ही ‘अधोहस्ताक्षारीत’ हा शब्द अपीलकर्त्याचा संदर्भ देतो आणि त्यांच्या स्वाक्षरी खाली ‘दलाल’ हा शब्द दिसतो. विक्रीसुचना पत्रात, तागाचे वितरण, कागदपत्रांचे वितरण न करणे, कागदपत्रांचा स्वीकार न करणे, दावे इत्यादींची संबंधित विविध तरतुदी आहेत, परंतु सर्वात जास्त महत्वाच्या तरतुदी परीछेद १० आणि ११ मध्ये आढळतात. परीछेद १० मध्ये अशी तरतूद आहे की, काही प्रकरणांमध्ये विक्रेत्यांना तग वितरीत करण्यासाठी दिलेल्या देय दिनांक ३० दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी, सर्व दंडाशिवाय मुदतवाढ दिली जाऊ शकते आणि जर कराराची पूर्तता मुदतवाढ दिलेल्या कालावधीत झाली नसल्यास, खरेदीदारांना बरेच विकल्प राहतील, त्यातला एक करार संपुष्टात आणण्याचा किंवा रद्द करण्याचा राहील आणि ज्यादिवशी या विकल्पांचा उपयोग केला त्यादिवशीचे बाजारमूल्य आणि करारात आकारण्यात आलेले मुल्य यातल्या फरकाचा बोजा विक्रेत्यावर राहील त्याच परिच्छेदमध्ये आणखीन एक तरतूद आहे की, ‘विक्रेत्यांनी खरेदीदारांना सूचित करावे की (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या विस्तारित कालावधीत वस्तू पाठविल्या जातील किंवा पाठविल्या जाणार नाहीत आणि जर विक्रेत्यांनी सूचित केले की ते विस्तारित कालावधीत वस्तू पाठवू शकणार नाहीत तर खरेदीदारांनी सूचना मिळाल्यानंतर पाच कामाचे दिवसाचे आत त्यंच्या पर्यायांचा वापर करवा आणि तसे विक्रेत्यांना सूचित करावे. विक्रेत्यांकडून अशी कोणतीही सूचना न मिळाल्यास माल पाठविला गेला नाही

असे मानले जाईल आणि खरेदीदारांनी वाढीव मुदत संपल्यानंतर पाच कामाचे दिवसांचे आत त्यांच्या पर्यायांचा वापर करवा आणि तसे विक्रेत्यांना सूचित करावे'.

अकराव्या परिच्छेदात इतर गोष्टींबरोबर अशीही तरतूद करणेत अली आहे की, ह्या कराराशी संबंधित किंवा परिणामी उद्भवणारे सर्व विषय, प्रश्न, वाद, मतभेद आणि / किंवा दावे, ह्या करारांतर्गत एक किंवा दोन्ही पक्षांच्या जबाबदार्या अशा विवादाच्या वेळी अस्तित्वात आहेत की नाही आणि हा करार संपुष्टात आला आहे किंवा संपुष्टात आणण्याचा किंवा पूर्ण करण्याचा हेतू आहे की नाही, हे सध्या अमलात असणाऱ्या लवाद न्यायाधीकरणाच्या नियमानुसार बंगाल चेम्बर ऑफ कॉमर्सच्या लवादाकडे पाठविले जातील आणि अश्या नियमांनुसार लवाद काम करेल.

ही बाब उभय पक्षी मान्य आहे की, उत्तरवादींनी करारांतर्गत २२५० मण ताग दिले परंतु उर्वरित २७४४ तागाचे वेळेत वितरण होऊ शकले नाही आणि परस्पर सहमतीने मुदत ३० जून १९४६ पर्यंत वाढविण्यात आली. २ जुलै १९४६ रोजी प्रतिवादींनी अपिल्कार्त्यांना लिहलेल्या पत्रात असे म्हटले होते की, वाघिणींच्या कमतरतेमुळे तागांची शिल्लक पाठवता आली नाही आणि त्यापत्राद्वारे एका महिन्याच्या कालावधीची मुदत वाढीची विनंती करण्यात आली होती. ३ जुलै १९४६ किंवा त्याच्या आसपास अपीलकर्त्यांना प्राप्त झालेल्या ह्या पत्राला उत्तर म्हणून मुदत ३१ जुलै १९४६ पर्यंत वाढविण्यात आली. प्रतिवादींना हे मुदतवाढीचे पत्र ९ जुलै, १९४६ रोजी प्राप्त झाले आणि त्याच दिवशी त्यांनी अपीलकर्त्यांना पत्र लिहून मुदतवाढीचे पत्र पाच कामकाजाच्या दिवसांमध्ये मिळालेले नसल्यामुळे करार आपोआप रद्द झालेला

आहे असे कळविले. ह्या पत्रानंतर दोन्ही पक्षांमध्ये आणखीन काही पत्रव्यवहार झाले आणि शेवटी फरकाचे रक्कम रुपये ४,११६/- चे बिल उत्तरवादींना दिले गेले ज्यांनी ती रक्कम देण्याची जबाबदारी नाकारली त्यावरून अपीलकर्त्यांनी विक्रीसूचनापत्र च्या कलम ११ अंतर्गत लवादाचा दावा दाखल केला आणि त्यांच्यातील आणि प्रतीवादिनमधील वाद बंगाल चेम्बर ऑफ कॉमर्स या लवादाकडे सादर केला. दिनांक ६ फेब्रुवारी १९४७ रोजी लवादाने असा निर्णय दिला की, परस्पर कराराद्वारे कराराची नियत तारीख ३१ जुलै १९४६ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे आणि त्यानुसार प्रतिवादींनी दिनांक ६ ऑगस्ट १९४६ पासून निवाड्याच्या दिनांकापर्यंत वार्षिक ४ टक्के दराने व्याजासह रक्कम रुपये ४,११६/- द्यावी आणि खर्चापोटी रक्कम रुपये २१०/- प्रतिवादींनी द्यावेत. जवळपास एक वर्षाने दिनांक १० फेब्रुवारी १९४९ रोजी कलकत्ता उच्च न्यायालयात त्याच्या मूळ दिवाणी अधिकारक्षेत्रात उत्तरवादींनी भारतीय लवाद कायदा १९४० चे अंतर्गत याचिका दाखल करून लवादाचा निवाडा हा अधिकारक्षेत्राच्या बाहेरचा असून तो अवैध आहे आणि तो उत्तरवादींवर बंधनकारक नाही आणि तो फेटाळून लावावा अशी मागणी केली.

या याचिकेतील प्रतीवादिनंचा मुख्य मुद्दा असा होता की, करारातील लवादाच्या अटीचा उपयोग करण्याची मोकळीक अपीलकरांना नव्हती कारण त्या कराराची बंगाल जूट कंपनी ही खरे पक्षकार होते नाकी अपिलकर आणि अपिलकरांनी केवळ दलाल म्हणून काम केलेले आहे. अपिलकरांनी आपल्या उत्तरात ठामपणे सांगितले की, प्रतिवादींनी त्यंच्यात आणि अपीलकर्त्यांमध्ये कसलाही कायदेशीर संबंध नसल्याचा

केलेला आरोप चुकीचा आहे. त्यांच्या प्रतिज्ञापत्राच्या परीछेद १६ मध्ये अपीलकर्त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, ‘ सदर याचिकेच्या परीछेद ७ च्या संदर्भात मला उक्त कराराच्या खऱ्या परिणामाकरिता कराराचा संदर्भ घ्यायचा आहे. मी आधीच म्हटले आहे की, व्यापाराच्या प्रथेनुसार किंवा परिपाठ किंवा प्रथेनुसार उत्तरवादी दलाली शुल्क आकारण्यास आणि उक्त कराराच्या अटींची बजावणी करण्यास देखील पत्र आहेत’.

ह्या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती सिन्हा यांच्यासमोर झाली ज्यांनी हा करार थेट प्रतिवादी आणि अपिलकार यांचे मध्ये होता या आधारावर याचिका फेटाळून लावली. विद्वान न्यायमूर्तींनी असे ही निरक्षण नोंदवले की, जर करारची अंमलबजावणी करण्याचा अपीलकरांचा अधिकार प्रथेच्या अस्तित्वावर अवलंबून असेल तर तसा पुरावा घेणे आवश्यक झाले असते आणि प्रथेच्या अस्तित्वाचा प्रश्न ठरविण्याकरिता लवादाना अधिकारक्षेत्र मिळाले असते.

न्यायमूर्ती सिन्हा यांच्या न्यायनिर्णयावर असमाधानी असेलल्या प्रतिवादींनी अपील दाखल केले ज्याची सुनावणी उच्च न्यायाल्याच्या द्वीसदस्वीय खंडपीठाने घेतली त्यात मुख्य न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती चक्रवर्ती यांचा समावेश होता. न्यायमूर्तींनी असे मत मांडले की, अपिलकरांनी दलाल म्हणून करार केला होता आणि व्यापाराच्या परिपाठामुळे किंवा प्रथेमुळे त्याच्या अटींची अंमलबजावणी करण्याचा त्यांना अधिकार होता असे अपीलकरांनी म्हणणे मांडलेले होते. ह्या वस्तूस्तिथीचा विचार करून न्यायमूर्ती सिन्हा यांना अपिलकरांना मुख्य व्यापारी म्हणून वागवण्याची मुभा नव्हती

आणि लवाद न्यायाधीकारानला देखील जी व्यक्ती कराराचा मुख्य पक्षकार नाही त्याच्या अर्जावर न्यायनिर्णय देण्याचा अधिकार नाही ह्या आधारावर तो न्यायनिर्णय रद्द करण्यास पात्र आहे.

त्यानंतर दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १०९ (सी) अंतर्गत उच्च न्यायलयाकडून प्रमाणपत्र मिळाल्यानंतर अपीलकर्त्यांनी हे अपील दाखल केले.

आम्हाला असे दिसते की, हे अपील एक छोट्याशा मुद्द्यावरून निकाली काढले जाऊ शकते. आम्ही मूळ कोर्टात अपीलकर्त्याच्या वतीने दाखल केलेले प्रतिज्ञा पत्र काळजीपूर्वक वाचलेले आहे आणि आम्ही असे म्हणू शकत नाही की, त्यांचा खटला असा होता की, ते कराराचे पक्षकार नव्हते किंवा त्यांनी कोर्टाला प्रथेनुसार किंवा व्यापाराच्या परीपाठावरून कराराची अंमलबजावणी करण्याचा त्यांनी अधिकार होता या एकमेव आधारावर केस पुढे चालवण्यास त्यांनी विनंती केली होती. आमच्या मते जे मुद्दे त्यांनी हाती घेतले होते त्यांचा गोषवारा खालीलप्रमाणे घेतला जाऊ शकतो.

1) प्रतिवादींचा आरोप की, अपिलकार प्रतिवादींच्या बरोबर कोणत्याही लवाद कराराचे पक्षकार नव्हते हा आरोप त्यांनी स्वीकारलेला नव्हता.
2) त्यांनी न्यायालायला करारचा अर्थ लावण्यास सांगितले आणि ते अमलात आणण्याचा अधिकार त्यांना आहे असा दावा केला.
3) त्यांनी असेही सांगितले की, त्यांना व्यापाऱ्याच्या प्रथेनुसार कराराची अमलबजावणी करण्याचा अधिकार आहे.

करारातील मर्यादित कालवधीत वितरणासाठी मुदतवाढ देण्यात आली होती की नाही हा या प्रकरणात उपस्थित झालेला मुख्य वाद होता. हा वाद निश्चितपणे लवाद वाद होतो. दलाल (अपिलकर्ते) हे मुख्य व्यापारी म्हणून त्यंच्या स्वतःच्या हक्काने कराराचे पक्षकार नव्हते तर त्यांनी बंगाल जुट मिल कंपनी तर्फे करार केला होता. हा वाद हे प्रकरण लवादाकडे जाई पर्यंत उपस्थित केला गेलेला दिसत नाही. त्या टप्प्यावर असा आक्षेप उपस्थित करणे प्रतिवादिंसाठी खुले होते असे गृहीत धरले तर जेंव्हा लवादाच्या कलमांतर्गत स्पष्ठपणे येणारा दुसरा वाद लवादाकडे पाठविल्यानंतर हा पुढील वाद जो कराराच्या खऱ्या अर्थावर अवलंबून राहतो आणि ज्यावेळेला अपिलकार म्हणतात की, ते मुख्य व्यापाऱ्यासारखे कराराने बांधील होते आणि उत्तरवादी ही बाब नाकारतात त्यावेळेला उत्तरवादींना कराराचा आधार घ्यावाच लागेल आणि जर अशी स्तिथी असेल तर, असा वाद, त्याचा निर्णय कराराच्या खऱ्या रचनेवर परिणाम करतो, तो देखील करारांतर्गत किंवा त्यातून उद्भवणारा किंवा त्याचाशी संबंधित विवाद असल्याचे दिसून येईल. हेमन विरुद्ध डार्विनस लिमिटेड (१) मध्ये उद्धृत केलेल्या परिच्छेदात लॉर्ड दुनेदिन ह्यांनी अशा प्रकारची चाचणी नेमून दिली आहे की, जर एखाद्या पक्षकाराला कराराचा आधार घ्यावा लागला तर तो वाद हा करारांतर्गतचा वाद आहे. ह्या प्रकरणी उत्तरवादींना त्यांचा दावा शाबित करण्याकरिता कराराचा आधार घेणे आवश्यक आहे म्हणूनच हा वाद लवाद वाद आहे. उच्च न्यायालयाच्या अपिलीय खंडपीठाचे विद्वान न्यायमूर्तींची, उत्तरवादींनी उपस्थित केलेला वाद हा अपीलकरांची करारा संबंधीची स्तिथी ही करारच झालेला नसल्याच्या

परीणामासारखी असण्याचे समजण्याची झालेली चूक होती. जर प्रतिवादींनी उपस्थित केलेले दोन्ही वाद लवादाच्या कक्षेत येतात असा निष्कर्ष आम्ही काढला तर प्रकरण संपेल कारण लवादांना विवादांवर अभिनिर्णय घेण्याचे अधिकारक्षेत्र असेल तर आम्ही त्यांनी केलेल्या कायद्याच्या कोणत्याही चुकीबाबत किंवा तथ्यांबाबत केलेल्या चुकीनबाबत किंवा एखादी बाब विचारतून वगळली असेल तर अशा कोणत्याही चुकांशी आम्ही विचार करत नाही आहोत. या दृष्टीकोनातून कराराचा खरा अर्थ लावणे आणि प्रतीवादिंचा युक्तिवाद योग्य आहे की नाही हे शोधणे आमच्यासाठी योग्य ठरणार नाही. एकदा वाद लवादाच्या कक्षेत असल्याचे आढळून आले की, वादाच्या गुणवत्तेत प्रवेश करणे हा न्यायालयाचा प्रांताचा भाग नाही. म्हणून आम्ही परिणामी आम्ही हे अपील मंजूर करतो आणि उच्च न्यायालयाच्या अपील खंडपिठाचा न्यायनिर्णय रद्द करतो आणि न्यायमूर्ती सिन्हा यांचा आदेश पुनःस्थापित करतो. अपिलकर त्यांच्या संपूर्ण खर्चे हक्कदार असतील.

न्यायमूर्ती महाजन –

मी माझे बंधू न्यायमूर्ती फझल यांचेशी सहमत आहे की हे अपील मंजूर केले जावे.

अपील मंजूर केले

अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी - पी. के. चॅटर्जी

प्रतिवादिंसाठी प्रतिनिधी - एम. जी. पोतदार

(1) (१९४२) ए.सी. ३५६.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x